# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, पुणे सन २०१६-१७

## सुधारीत प्रसिध्दी निवेदन

दि.२७.०९.२०१६.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांचे इयत्ता ११वी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होत आहेत.

इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१६-१७ साठी दि.२४.०९.२०१६ अखेर नियमित ५ फे-या व ५ विशेष फे-या अंतर्गत प्रवेश प्रक्रिया झालेली आहे, परंतु पुढील काही कारणास्तव दिनांक २२.०९.२०१६ पासून या कार्यालयाकडे विद्यार्थी इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशासाठी विनंती/तक्रारी करत आहेत.

१) एनआयओएस (नॅशनल ओपन स्कूल) चा इ. १० वी चा निकाल दि.२२.०९.२०१६ रोजी लागला सदरील उत्तीर्ण विद्यार्थी

२) जुलै २०१६ च्या पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थी तसेच एटीकेटी प्राप्त विद्यार्थ्यांचे पसंतीक्रम व मेरीट न जुळल्यामुळे ॲलोकेशन न मिळालेले विद्यार्थी.

३) आज अखेर फे-यामध्ये अर्धवट फॉर्म भरलेले, ॲप्रुव्हल न घेतलेले, पसंतीक्रम न भरलेले विद्यार्थी

४) ग्रामीण भागातुन आलेले, व अन्य कारणास्तव अद्यापही फॉर्म न भरलेले विद्यार्थी

५) मुदतीत प्रवेश न घेतल्यामुळे प्रवेश न मिळालेले विद्यार्थी

६) इतर कारणास्तव प्रवेशाबाबत तक्रार असणारे विद्यार्थी

वरील कारणास्तव दिनांक २६.०९.२०१६ ते २८.०९.२०१६ अखेर तक्रार नोंदवुन घेवुन त्यांचे पसंतीक्रम विशेष फेरी-५ नंतरच्या रिक्त जागांप्रमाणे व गुणवत्तेप्रमाणे दि.२८.०९.२०१६ रोजी एस.एम.जोशी महाविद्यालय, हडपसर, पुणे-२८ येथे भरुन घेण्यात येणार आहेत, व तेथेच नवीन लॉग-इन आयडी व पासवर्ड रु.१००/- (शंभर) घेवुन उपलब्ध करुन दिला जाईल व सदर विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी २९.०९.२०१६ दुपारी १२.०० वाजता जाहीर करण्यात येईल, व हे प्रवेश दिनांक २९.०९.२०१६ रोजी दुपारी १ ते सायंकाळी ५.०० पर्यंत व दि. ३०.०९.२०१६ सकाळी १०.०० ते ५.०० वाजपर्यंत या वेळेतच होतील याची नोंद घ्यावी. या वेळे व्यतिरिक्त उशिरा प्रवेशासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश होणार नाहीत. दि. ३०.०९.२०१६ अखेर होणा-या प्रवेशानुसार असणा-या विद्यार्थी संख्येप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ची संच मान्यता होणार आहे.

सदरचे प्रसिध्दीपत्रक इ. ११वी ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या **http://pune.fyjc.org.in** या संकेतस्थळावर व शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे या कार्यालयाच्या **www.dydepune.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(दिनकर टेमकर)
अध्यक्ष,
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१